

कोल्हापूर : १) जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त पद्मश्री मुरलीकांत पेटकर यांचा श्री अंबाबाईची प्रतिमा देऊन सत्कार करताना असोसिएशनचे उपाध्यक्ष विनोद भोसले. २) आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू प्रकाश पदुकोण यांचा सत्कार करताना असो.चे अध्यक्ष सतीश घाटगे. ३) शिवछत्रपती पुरस्कार विजेते श्रीकांत वाड यांचा सत्कार करताना तन्मय करमरकर. ४) ध्यानचंद पुरस्कारप्राप्त तृप्ती मुरगुंडे यांचा सत्कार करताना वर्षा नाडगोंडे.

# शाबासकीची थाप अन् भारावलेले खेळाडू

## जिल्हा बॅडमिंटनतर्फे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील यशस्वी खेळाडूंचा सत्कार

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १३ : कोल्हापूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात पाठीवर मिळालेल्या शाबासकीच्या थापेने राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केलेले खेळाडू आज भारावून गेले. एकेकाचे सत्कार होतील, तसा टाळ्यांचा कडकडाट सुरू झाला आणि प्रत्येकाची छाती अभिमानाने फुलली. रेसिडेन्सी क्लबमध्ये कार्यक्रम झाला.**

बॅडमिंटन असोसिएशनच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त जिल्ह्यातील खेळाडूंचा स्नेहमेळाच आज भरला होता. जुन्या आठवणींना उजाळा देत प्रतिकूल परिस्थितीत केलेला सराव, पदक हाती घेतानाचे क्षण अनेकांच्या नजरेसमोरून गेले. आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या खेळाडूंच्या हस्ते सत्कार होणार असल्याने त्याचेही त्यांना कौतुक होते. त्यामुळे प्रत्येक जण कार्यक्रम कधी सुरू होईल, याच्या प्रतीक्षेत होता. पद्मश्री मुरलीकांत पेटकर यांच्या प्रतीक्षेत पदाधिकारी थांबून होते. त्यांच्यासह आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू प्रकाश पदुकोण यांचा सभागृहात प्रवेश होताच, सर्वांच्या नजरा त्यांच्यावर खिळल्या. असोसिएशनचे अध्यक्ष सतीश घाटगे यांनी सुवर्णमहोत्सवाचा आढावा घेताना असोसिएशनच्या वाटचालीची माहिती दिली. त्यानंतर आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू प्रकाश पदुकोण, पद्मश्री मुरलीकांत पेटकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते श्रीकांत वाड व ध्यानचंद पुरस्कारप्राप्त तृप्ती मुरगुंडे यांचा श्री अंबाबाईची प्रतिमा देऊन सत्कार होताच टाळ्यांचा कडकडाट झाला.

अर्जुन पुरस्कारप्राप्त शोभा मूर्ती, मयूर तावडे, आरती पाटील, संयोगिता घोरपडे, दकधीयानी पाटील, ऋषिकेश साखरपे, इक्बाल मैंदर्गी, जान्हवी कानिटकर, करण जाधव, पौरुष कुलकर्णी, प्रतीक रानडे, प्रेरणा आळवेकर, राहुल काणे, रुतिका कांबळे, सारंग देशपांडे, सरोज सावंत, सुरेश नाडगोंडे, वैभवी सबनीस, वैशाली आगाशे, वर्षा नाडगोंडे, ऋचा आळवेकर, सिद्धांत घोरपडे यांचा सत्कार झाला. याप्रसंगी खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, उजाला पदुकोण, उपाध्यक्ष विनोद भोसले, तन्मय करमरकर, सुमित चौगुले, चंद्रशेखर सोवनी, साईनाथ खणगाव, योगिनी कुलकर्णी, अरुणा रसाळ, जगदीश काणे, शिरीष गुर्जर, सरिता गुर्जर, उपस्थित होते. केदार नाडगोंडे यांनी सूत्रसंचालन केले.

### आरती पाटीलच्या यशाचे कौतुक

**■ यावेळी पॅरालिंपिक खेळाडू आरती पाटील हिचा पद्मश्री मुरलीकांत पेटकर यांच्या हस्ते अंबाबाईची प्रतिमा देऊन सत्कार होताच खेळाडूंनी टाळ्यांचा कडकडाट केला. दोघांनी प्रतिकूल परिस्थितीत मिळविलेल्या यशाचे सर्वांनी कौतुक केले.**





केडीबीएच्या स्मरणिकेचे प्रकाशन करताना (डावीकडून) सतिश घाटगे, श्रीकांत वाड, उजाला पदुकोण, प्रकाश पदुकोण, तृप्ती
आदी. २) केडीबीए आयोजित सत्कार समारंभात ज्येष्ठ दिव्यांग जलतरणपटू मुरलीकांत पेटकर यांचा अंबाबाईची प्रतिमा देऊन
उपाध्यक्ष विनोद भोसले.

# आजी–माजी बॅडमिंटनपटूंचा गौ

## ा वर्षातील पदार्पणानिमित्त केडीबीएच्या वतीने गौरव : मुरलीकांत पेटकर यांचाही विशे

प्रतिनिधी
कोल्हापूर
जिल्हा बॅडमिंटन
नने (केडीबीए) ५१
पर्दापण केल्यानिमित्ताने
बॅडमिंटनमध्ये गरुडझेप
आजी–माजी राज्य,
आंतरराष्ट्रीय २३
चा सत्कार करण्यात
ासदार श्रीमंत शाहू
यांच्या उपस्थितीत
लबमध्ये सत्कार समारंभ
केला होता. मानचिन्ह
जॅकेट असे सत्काराचे

ारंभाच्या सुरुवातीला
र्जुन जीवनगौरव पुरस्कार
लेले ज्येष्ठ दिव्यांग
मुरलीकांत पेटकर
ष सत्कार करण्यात
च त्यांनी जलतरणात

### ऋतिकाला २५ हजार तर प्रेरणाला १० हजार रुपयांचे बक्षीस

कोल्हापुरातील ऋतिकां कांबळेने बॅडमिंटनमध्ये उत्तम कामगिरी करत राष्ट्रीय स्पर्धेत प्रतिनिधीत्व केले आहे. प्रेरणा आळवेकरने तर मोठी मजल मारत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्रनिधीत्व करत विविध देशांमधील खेळाडूंना हरवण्याची कामगिरी केली आहे. याची दखल घेऊन केडीबीएने ऋतिकाला २५ हजार रुपयांचा व प्रेरणाला १० हजार रुपयांचा धनादेश देऊन गौरवले. पदुकोण व वाड यांच्या हस्ते त्यांनी धनादेश स्वीकारला.

केलेल्या कामगिरीवर तयार केलेला लघूपटही दाखवला. यानंतर माजी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू व पद्मश्री प्रकाश पदुकोण, माजी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू तृप्ती मुरगुंडे, महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनचे मानद सचिव श्रीकांत वाड यांनी बॅडमिंटनमध्ये केलेल्या कामगिरीवर दृष्टीक्षेप टाकणारा लघुपट दाखवला. यावेळी असोसिएशनने तयार केलेल्या स्मरणिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तसेच पदुकोण यांच्या हस्ते असोसिएशनच्या संकेतस्थळाचेही अनावरण केले. यानंतर आजी–माजी बॅडमिंटनपटूंचा पदुकोण, वाड, मुरगुंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू आरती पाटील, ज्येष्ठ बॅडमिंटनपटू शोभा मूर्ती, वर्षादेवी नाडगोंडे, इक्बाल मेंहदर्गी, सुरेश नाडगोंडे, सरोज रासम, तृप्ती मुरगुंडे, वैभवी सबनीस, वैशाली आगाशे, मयुर तावडे, पौरस कुलकर्णी, प्रतिक रानडे, जानवी कानिटकर, ऋतिका

- बॅडमिंटनमध्ये ग
घेतलेल्या आजी
खेळाडूंचा सत्का
- स्मरणिकेसह सं
अनावरण

कांबळे, संयोगिता घ
पाटील, करण ज
साखरपे, राहुल
देशपांडे, ऋचा आ
घोरपडे अशी सत
आहेत.

यावेळी प्रकाश
पत्नी उजाला पदुक
उपाध्यक्ष विनोद
तन्मय करमरक
जगदिश काणे, आ
निशिकांत पाटील
होते. केडीबीएचे
घाटगे यांनी स्वाग
केले.

# टनपटू फिजीकली, मेंटली फिट असणे आवश्यक

## आयोजित बॅडमिंटन संवाद कार्यक्रम : प्रकाश पदुकोण, श्रीकांत वाड यांचा

तिनिधी
ोल्हापूर
इतर खेळाप्रमाणे
ही बदलत चालला
डूंनी बदलाप्रमाणे
रून देत स्वत:ला
मना पूर्ण क्षमतेने
कॅपेबल करावे.
मर ठरणाऱ्या सोशल
ाह विविध अनावश्यक
लांब राहण्याची
तयार ठेवावी. पूर्वीच्या
ा बॅडमिंटन सामना
कमालीचा वेग आला
ळे खेळाडूने वेगाने
सामन्यावर पकड
फिजीकली, मेंटली फिट
व स्किलफूल असणे
आहे. जे खेळाडू
य स्किलफूल असतील,
त. सर्वोत्तम खेळ करु
असा मौलिक सल्ला
ल्ह्यातील बॅडमिंटनपटूंना
मिळाला.
होते कोल्हापूर जिल्हा
सोसिएशन (केडीबीए)
बॅडमिंटन संवादाचे.
१ व्या वर्षात पर्दापण
ने संवाद कार्यक्रमाचे
रण्यात आले होते. या
ी प्रमुख अतिथी म्हणून
तरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू
कोण, ध्यानचंद पुरस्कार
माजी आंतरराष्ट्रीय
तृप्ती मुरगुंडे, महाराष्ट्र
असोसिएशनचे मानद
ांत वाड उपस्थित होते.



कोल्हापूर : केडीबीए आयोजित बॅडमिंटन संवाद कार्यक्रमात बोलताना माजी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू प्रकाश पदुकोण. सोबत (डावीकडून) केदार नाडगोंडे, श्रीकांत वाड व तृप्ती मुरगुंडे.

### प्रशिक्षकांचा सल्ला महत्वपूर्ण- प्रकाश पदुकोण

बॅडमिंटनच्या सामन्यात खेळाडूंमधील क्षमता, सराव, खेळ, जिद्द आणि मानसिक संतुलन ही पंचसुत्री एकाचवेळी पहायला मिळत असते. तेव्हा खेळाडूंना या पंचसुत्रीत स्वत:ला फिट बसवावे. युट्युबवर सर्च करुन दिग्गज खेळाडू कसे खेळतात हे पहावे. हे करतानाच सरावात आपले प्रशिक्षक खेळ, कौशल्यासंदर्भात काय सांगत आहेत, हेही गांभिर्याने ऐकून त्यानुसार सराव करावा. दैनंदिन सरावात कौशल्याचा केलेला सराव हा प्रत्यक्ष सामना खेळताना उपयोगी पडतो. सरावानंतर काही काळ म्युझिक ऐकावे. थोडे नृत्यही करावे. आपल्याकडे एखादी कला असेल तर त्यातही थोडे लक्ष घालावे. मेंटली आणि फिजीकली फिट राहण्यासाठी असे करणे गरजेचे आहे. मैदानात आपला टान्स (उभे राहण्याची पद्धत) आणि दोन्ही पायांचा बॅलेन्स फरफेक्ट असणेही गरजेचे आहे, असा मौलिक सल्लाही त्यांनी यावेळी दिला.

असोसिएशनचे अध्यक्ष सतिश घाटगे यांनी स्वागत केल्यानंतर राष्ट्रीय बॅडमिंटन केदार नाडगोंडे यांनी पदुकोण, वाड व मुरगुंडे यांची मुलाखत घेतली. कोल्हापुरातील खेळाडूंना मोठी शिकवण मिळेल हा मुद्दा डोळ्यासमोर टेक्निकल ट्रेनिंग, मेंटल फिटनेस आणि मोटिवेशनवर आधारीत नाडगोंडे यांनी पदुकोण, वाड व मुरगुंडे यांना प्रश्न विचारले. त्यांनी या प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन खेळाडूंना प्रोत्साहित केले.

### बॅडमिंटनमधील ध्येय निश्चित करावे... श्रीकांत वाड

बहुतांश खेळाडू हे बॅडमिंटनचा पाया शिकण्याआधीच स्पर्धा खेळत असतात. यातून आलेल्या अपयशातून अनेक खेळाडू क्षमता

असूनही बाजूला फेकले
आपल्याबाबतीत असे ह
नसेल तर खेळाडूंनी स
बॅडमिंटनमधील आपले ध्ये
करावेच लागेल. ध्येय
झाले की बॅडमिंटनमधील
म्हणून पाहिल्या जाणाऱ्या
डाएट, स्किल यावर ल
सरावात झोकून द्यावे.
कन्सिटंटसी राहिल असे वे
करावे. सामन्यातील यश
पाहण्यापेक्षा सर्वोत्तम खे
होईल, हे महत्वाचे मान
सर्वोत्तम खेळ हा यश
खेचून आणतोच आणतो.

**अपयशाचा ताण घेऊ न**

सामना म्हंटले की य
हे आलेच. आपल्याला
अपयश आले म्हणून त
घेऊ नका. उलट सराव
आपले कुठे चुकतो, का
करावी लागेल, यावर
लक्ष केंद्रीत करा.
झालेल्या चुका क
आपल्यात सुधारणा हो
प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या को
मारण्यासाठी आवश्यक
बॅकहॅण्ड आणि फोरहॅण्डच
शेकडो वेळा करा. आप
बॅडमिंटन भिनवण्यासा
माईंड सेट करा. सामन
खेळाडूंना हार्ड ॲण्ड फ
घ्यावे लागतात. रोजच्या
हे शक्य होणार अस
मुरगुंडे यांनी सांगित
केडीबीएचे उपाध्यक्ष वि
तन्मय करमरकर, चंद्रशे
आदी मान्यवर उपस्थित

लोकमत

# फिटनेस, तंत्र, कौशल्यांवर लक्ष द्या

## ...काश पदुकोण : जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचा सुवर्णमहोत...

लोकमत न्यूज नेटवर्क

...पूर : खेळाडूंनी फिटनेस, वेग, ...यांसह विविध कौशल्यावर भर ... खेळात प्रगती करावी. मनगट, ... रॅकेट पकडण्याची पद्धत याकडे ...ूंनी विशेष लक्ष द्यावे, असा ...त्र आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन ...ू पद्मश्री प्रकाश पदुकोण यांनी ...ूंना दिला.

...ल्हापूर जिल्हा बॅडमिंटन ...सिएशनच्या सुवर्णमहोत्सवी ...मित्त सोमवारी विविध कार्यक्रम ... सकाळी पद्मश्री प्रकाश पदुकोण, ...ष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनचे ... सचिव आणि शिवछत्रपती ...राने सन्मानित श्रीकांत वाड, ...ंद पुरस्काराने सन्मानित ...टनपटू तृप्ती मुरगुंडे यांनी ...ूसोबत संवाद साधला. रेसिडन्सी ... येथे कार्यक्रम झाला. जिल्ह्यातील ...टन खेळाडू व प्रशिक्षक उपस्थित ... केदार नाडगोंडे यांनी वक्त्यांची ...त घेतली.

...श्री पदुकोण म्हणाले, ...याही खेळाचा पाया भक्कम होणे ... आहे. सरावात सातत्य आणि बदलते तंत्रज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे. बदलत्या परिस्थितीनुसार खेळातही आमूलाग्र बदल करणे गरजेचे आहे. निष्ठा व अविरत कष्टांना पर्याय नाही.

श्रीकांत वाड आणि तृप्ती मुरगुंडे यांनीही बॅडमिंटन खेळातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनुभव मांडले. यातून खेळातील बदलत्या तंत्रांबद्दल माहिती उपस्थित खेळाडूंना दिली. खेळाडूंनी आपल्या खेळावर पूर्णपणे लक्ष द्यावे. सोशल मीडिया, पार्टी यांपासून अलिप्त राहण्याचा काटेकोर प्रयत्न करावा. खेळ परिपूर्ण होण्यासाठी बारकाई लक्ष ... प्रशिक्षकांनीही सध्याचे ट्रेंड्स ... घेऊन तसे प्रशिक्षणात बदल क... असा सल्ला मान्यवरांनी ... संवादानंतर खेळाडूंनी विचार... प्रश्नांची उत्तरे मान्यवरांनी दिली.

यावेळी कोल्हापूर जिल्हा बॅड... असोसिएशनचे अध्यक्ष ... घाटगे, उपाध्यक्ष विनोद भोसले, ... सचिव तन्मय करमरकर, सह... सुमित चौगुले, खजिनदार चं... सोवनी, वर्षा नाडगोंडे, स... खणगाव, अरुणा रसाळ, जगदीश... उपस्थित होते.



कोल्हापुरात सोमवारी रेसिडेन्सी क्लबमध्ये बॅडमिंटन क्षेत्रातील मान्यवरांनी खेळाडूंसोबत संवाद साधला. केदार नाडगोंडे यांनी त्यांची प्रकट मुलाखत घे... यावेळी पद्मश्री प्रकाश पदुकोण, श्रीकांत वाड, तृप्ती मुरगुंडे उपस्थित होते.

लोकमत

# बॅडमिंटन असोसिएशनकडून जिल्ह्यातील २२ खेळाडूंचा सन्मान

## असोसिएशनच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाची स्मरणिका प्रकाशित

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनने सोमवारी सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त जिल्ह्यातील २२ खेळाडूंना आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू पद्मश्री प्रकाश पदुकोण, पद्मश्री मुरलीकांत पेटकर, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त श्रीकांत वाड तसेच ध्यानचंद पुरस्कार विजेत्या बॅडमिंटनपटू तृप्ती मुरगुंडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. खासदार शाहू छत्रपती यांनी उपस्थिती लावत या खेळाडूंचे विशेष कौतुक केले.

येथील रेसिडेन्सी क्लबच्या सभागृहात पार पडलेल्यार समारंभात पद्मश्री मुरलीकांत पेटकर आणि प्रकाश पदुकोण यांनी प्रवेश करताच टाळ्यांच्या कडकडाट झाला. प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या क्रीडा क्षेत्रातील कार्याचा आढावा घेणारे चित्रफीत दाखवण्यात आल्या. असोसिएशनचे अध्यक्ष सतीश घाटगे यांनी सुवर्ण महोत्सवाचा आढावा घेतला.

यावेळी प्रकाश पदुकोण, मुरलीकांत पेटकर, श्रीकांत वाड आणि तृप्ती मुरगुंडे यांचा अंबाबाईची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी उजाला पदुकोण, उपाध्यक्ष विनोद भोसले, तन्मय करमरकर, सुमीत चौगुले, चंद्रशेखर सोवनी, साईनाथ खणगाव, योगिनी कुलकर्णी, अरुणा रसाळ, जगदीश काणे, शिरीष गुर्जर, सरिता गुर्जर उपस्थित होते. केदार नाडगोंडे यांनी सूत्रसंचालन केले.



कोल्हापुरात रेसिडेन्सी क्लब येथे सोमवारी रेसिडेन्सी क्लबमध्ये बॅडमिंटन असोसिएशनच्या स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळ सतीश घाटगे, श्रीकांत वाड, उजाला पदुकोण, प्रकाश पदुकोण, तृप्ती मुरगुंडे, तन्मय करमरकर उपस्थित होते. (छाया : आदित्य वेल्हाळ)

### मान्यवरांकडून खेळाडूंचा सन्मान

समारंभात अर्जुन पुरस्कार प्राप्त शोभा मूर्ती, मयूर तावडे, आरती पाटील, संयोगिता घोरपडे, दकधीयानी पाटील, ऋषीकेश साखरपे, इक्बाल मैंदर्गी, जान्हवी कानिटकर, करण जाधव, पौरुष कुलकर्णी, प्रतिक रानडे, प्रेरणा आळवेकर, राहुल काणे, रुतिका कांबळे, सारंग देशपांडे, सरोज सावंत, सुरेश नाडगोंडे, वैभवी सबनीस, वैशाली आगाशे, वर्षा नाडगोंडे, रुचा आळवेकर, सिद्धांत घोरपडे यांचा सत्कार झाला. शोभा मूर्ती यांनी ऑडिओ संदेशातून आभार मानले.

# युवा बॅडमिंटनपटूंनी नवतंत्रज्ञान अवगत करावे : प्रकाश पदुकोण

## कोल्हापुरातील बॅडमिंटन क्षेत्रातील नामवंत खेळाडूंचा सत्कार



कोल्हापूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनच्या स्मरणिकेचे प्रकाशन प्रकाश पदुकोण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सतीश घाटगे, श्रीकांत वाड, उज्ज्वला पदुकोण, तृप्ती मिरगुंडे आदी. (छाया : मिलन मकानदार)

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर श मिळवण्यासाठी युवा बॅडमिंटन खेळाडूंनी नवीन तंत्रज्ञान अवगत करावे, असे प्रतिपादन पद्मश्री पुरस्कार विजेते आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू प्रकाश दुकोण यांनी केले. कोल्हापूर डिस्ट्रिक्ट बॅडमिंटन असोसिएशनच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी पद्मश्री पुरस्कारप्राप्त मुरलीकांत पेटकर, महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनचे मानद सचिव श्रीकांत वाड यांचा विशेष पुरस्कार देऊन, तर अर्जुन पुरस्कार विजेत्या शोभा मूर्ती, ध्यानचंद पुरस्कारप्राप्त तृप्ती मिरगुंडे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते आरती पाटील, मयुर तावडे, संयोगिता घोरपडे यांचाही गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास खा. शाहू महाराज प्रमुख उपस्थित होते. यावेळी कोल्हापुरातील नामवंत बॅडमिंटन खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

प्रकाश पदुकोण यावेळी म्हणाले, बॅडमिंटनबाबत युवा खेळाडूंमध्ये जागरुकता निर्माण होत आहे. खेळाडूंनी फिटनेसकडे लक्ष देण्याची गरज आहे. मनगट, खांदे आणि रॅकेट पकडण्याची पद्धत अवगत करण्याची गरज आहे. वेग, तंत्र यासह विविध कौशल्यावर भर देऊन खेळात प्रगती करावी.

श्रीकांत वाड म्हणाले, बॅडमिंटन खेळात आंतरराष्ट्रीय पातळीवर अजून चांगले खेळाडू तयार झाले पाहिजेत. या निमित्ताने असोसिएशनतर्फे विविध कार्यक्रम झाले. सकाळच्या सत्रात प्रकाश पदुकोण, श्रीकांत वाड व तृप्ती मिरगुंडे यांच्याशी निवडक खेळाडू व कोच यांनी संवाद साधला. यावेळी त्यांनी बॅडमिंटन खेळातील राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनुभव मांडले. प्रशिक्षकांनीही सध्याचे ट्रेंडस् लक्षात घेऊन त्याप्रमाणे प्रशिक्षणात बदल आणावेत, असा सल्ला दिला.

प्रास्ताविक कोल्हापूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष सतीश घाटगे यांनी केले. कार्यक्रमास सौ. उज्ज्वला पदुकोण, उपाध्यक्ष विनोद भोसले, मानद सचिव तन्मय करमरकर, सहसचिव सुमित चौगुले, खजिनदार चंद्रशेखर सोवनी, वर्षा नाडगोंडा, साईनाथ खणगाव, अरुणा रसाळ, जगदीश काणे उपस्थित होते. यावेळी असोसिएशनच्या स्मरणिकेचे प्रकाशन व बॅडमिंटन असोसिएशनच्या वेबसाईटचे अनावरण पदुकोण यांच्या हस्ते करण्यात आले.




अठरावे पुण्यस्मरण..!

आता सहवास नसला तरी,
स्मृती सुगंध दरवळत राहील..
जीवनाच्या प्रत्येक वळणावर,